

कोल्हापूर : स्मरणिका ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. शिवाजी जाधव, व्ही. टी. पाटील, डॉ. निशा मुडे-पवार, वसंत भोसले. (छाया : पप्पू अत्तार)

# पत्रकारितेतील बदलांना पूरक अशा अभ्यासक्रमांचा वेध घ्या : कुलगुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना साथीमुळे जीवन व शिक्षणाचे संदर्भ बदलत आहेत. या बदलांना पत्रकारितेचे क्षेत्रही अपवाद राहिलेले नाही. पत्रकारितेतील बदलांना पूरक अशा अभ्यासक्रमांचा शोध व वेध घेणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त तयार करण्यात आलेल्या 'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' या स्मरणिका ग्रंथाचे प्रकाशन डॉ. शिंदे यांच्या हस्ते व ज्येष्ठ पत्रकार-संपादक वसंत भोसले यांच्या उपस्थितीत मंगळवारी झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी व्ही.

## • वृत्तपत्रविद्या विभागाच्या सुवर्णमहोत्सवी स्मरणिका ग्रंथाचे प्रकाशन

टी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू शिंदे म्हणाले, पत्रकारिता अधिविभागाने ५० वर्षांत अनेक दिग्गज पत्रकार दिले आहेत. यापुढील काळातही पत्रकारितेच्या क्षेत्राला दिशा देण्याचे कार्य विभागाने करावे.

अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे-घाटगे, सुधाकर बरगे उपस्थित होते.

# कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कोल्हापूरचा घेतला निरोप

## प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर आज पदभार स्वीकारणार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज जिल्ह्याचा निरोप घेतला. त्यांनी राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांना अभिवादन केले. त्यांच्या पुतळ्यांना त्यांनी पुष्पहार अर्पण केले. करवीर निवासिनी श्री अंबाबाईचे दर्शनही त्यांनी घेतले. बुधवारी ऑनलाईन कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांचा निरोप समारंभ होणार आहे. यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर पदभार घेतील, अशी शक्यता आहे.

डॉ. देवानंद शिंदे यांनी पाच वर्षापूर्वी कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारला. त्यांच्या कारकिर्दीत विद्यापीठात अनेक सकारात्मक बदल झाले. विद्यापीठाने विविध विद्यापीठे, संस्था यांच्याशी सामंजस्य करार केले. विविध सामाजिक प्रश्न, नैसर्गिक आपत्ती यामध्ये विद्यापीठाने मोलाचे योगदान दिले. बुधवारी (ता.१७) ते कुलगुरू पदावरून मुक्त होत आहेत. यानंतर ते औरंगाबाद येथील त्यांच्या मूळ संस्थेत प्राध्यापक म्हणून रुजू होतील. आज त्यांनी महापुरुषांच्या शहरातील पुतळ्यांचे दर्शन घेतले. कोल्हापूरच्या पुरोगामी नगरीने दिलेला विचार आयुष्यभर सामाजिक कार्यात राहण्याची, शिक्षण सेवा करण्याची प्रेरणा देईल, असे उद्‌गार त्यांनी काढले. कोरोनामुळे बुधवारी (ता.१७) त्यांचा ऑनलाईन निरोप समारंभ होणार आहे. त्यानंतर प्रभारी कुलगुरू डॉ.नितीन करमळकर हे सूत्रे घेण्याची शक्यता आहे.

# विद्यापीठाचा डी. वाय. पाटील विद्यापीठाबरोबर करार

## विद्यार्थी-कर्मचाऱ्यांना मिळणार आरोग्य सुविधांचा लाभ ; संशोधनासाठीही संधी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेच्या अभिमत विद्यापीठाबरोबर शैक्षणिक व वैद्यकीय सुविधांच्या अनुषंगाने पंचवार्षिक सामंजस्य करार केला आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य, औषधनिर्माण तसेच आरोग्यविषयक समाजशास्त्र विषयांत संशोधन विकासाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुद्गल, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वाक्षरी केल्या.

डी. वाय पाटील विद्यापीठाचे डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय हे सुमारे ८०० बेडचे मल्टीस्पेशालिटी शैक्षणिक रुग्णालय आहे. या सामंजस्य करारान्वये विद्यापीठाचे विद्यार्थी, कर्मचारी आणि त्यांचे नातेवाईक यांना २० टक्के सवलतीच्या दरात सुविधा उपलब्ध होतील. प्रयोगशाळा व रेडिओलॉजी या सेवा १० टक्के सवलतीच्या दरात दिल्या जातील. रुग्णालयातील समुपदेशन केंद्राच्या सेवा विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना मोफत मिळणार असून, विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, अन्य कार्यक्रम इत्यादीप्रसंगी ॲम्ब्युलन्स तसेच अन्य आरोग्यविषयक सुविधाही दिल्या जाणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, डी. वाय. पी. विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. संजय जाधव, अधीक्षक विनोद पंडित, शिवाजी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. विनिता रानडे, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीक्षक डॉ. व्ही. व्ही. गायकवाड उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठच्या डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाबरोबर झालेल्या सामंजस्य कराप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुद्गल. सोबत डॉ. विनिता रानडे, डॉ. व्ही. व्ही. भोसले, प्र-कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, आदी.**

### सामंजस्य करार दूरगामी महत्त्वाचा : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाबरोबर केलेला सामंजस्य करार आरोग्य, औषधनिर्माण, आरोग्यविषयक पूरक सेवा, संशोधन विकासाच्या अनुषंगाने दूरगामी महत्त्वाचा आहे. सध्या कोविड-१९सारख्या साथींमुळे समाजाच्या आरोग्यविषयक जाणीवा तीव्र झाल्या आहेत.



कोल्हापूर : बिंदू चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. (छाया : पप्पू अत्तार)

# कुलगुरूंनी घेतला भावनिक निरोप...

## महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

करवीरचे आराध्य दैवत करवीर निवासिनी श्री अंबाबाईसह महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचा वारसा देणाऱ्या शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांचे भर पावसात दर्शन घेऊन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मंगळवारी शिवाजी विद्यापीठातील कारकिर्दीच्या अंतिम दिवसाच्या पूर्वसंध्येला करवीर नगरीचा भावनिक निरोप घेतला.

कोरोनाच्या साथीमुळे श्री अंबाबाई मंदिर दर्शनासाठी बंद असल्यामुळे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी महाद्वारात उभे राहून अंबाबाईचे मुखदर्शन घेतले. त्यानंतर छत्रपती शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. बिंदू चौकामध्ये महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांसह शहीद स्मृतिस्तंभास अभिवादन केले. दसरा चौक येथे जाऊन राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यासही त्यांनी पुष्प वाहून अभिवादन केले. स्वामी विवेकानंद संस्थेच्या कार्यस्थळावरील डॉ. बापूजी साळुंखे आणि राजीव गांधी चौकातील लोकनेते बाळासाहेब देसाई आणि करवीर संस्थापक छत्रपती ताराराणी यांच्या पुतळ्यांचेही दर्शन घेऊन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी अभिवादन केले. यावेळी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे त्यांच्यासमवेत होते.

# डॉ. देवानंद शिंदे यांना आज निरोप

## वेबसाईटवरून होणार कार्यपूर्ती संवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या निरोप समारंभाचा कोणताही जाहीर समारंभ करण्यात येणार नाही. बुधवारी (दि. १७) सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या वेबसाईटवर कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कार्यपूर्ती संवादाचे थेट प्रक्षेपण करण्यात येईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर जाहीर निरोप समारंभ करण्याचे टाळून ऑनलाईन स्वरूपात औपचारिक संवाद आयोजित करण्याचे विद्यापीठ प्रशासनानेठरविले आहे. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटवरून उद्या सकाळी दहा वाजता संवादाचे थेट प्रक्षेपण करण्यात येईल. ऑनलाईन स्वरूपातच सर्व संबंधित घटकांनी कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, प्रभारी कुलगुरु म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर हे कार्यभार स्वीकारणार आहेत.

# कुलगुरु शिंदे यांचा आज निरोप समारंभ

## प्रभारी कुलगुरु डॉ. करमळकर स्वीकारणार पदभार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या निरोप समारंभ १७ रोजी होणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही जाहीर समारंभ न घेता विद्यापीठाच्या वेबसाईटवर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कार्यपूर्ती संवादाचे सकाळी १० वाजता थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटवरून



सकाळी १० वाजता या संवादाचे थेट प्रक्षेपण करण्यात येईल. ऑनलाइन स्वरुपाताचा सर्व संबंधित घटकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे.

### डॉ. शिंदे यांचे अंबाबाई देवीसह शिव - शाहूंना अभिवादन

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी मंगळवारी महाद्वार चौकात उभे राहून करवीर निवासीनी श्री अंबाबाई देवीचे मुखदर्शन घेतले. त्यानंतर छत्रपती शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास, बिंदू चौक येथील महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांसह शहीद स्मृतीस्तंभास, दसरा चौक येथे जाऊन राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यासह करवीर संस्थापक छत्रपती ताराराणी यांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन पुष्पहार घालून कुलगुरू डॉ. शिंदे यांनी अभिवादन केले. यावेळी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे सोबत होते.



**प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर पदभार स्वीकारणार**

दरम्यान, बुधवारी सकाळी ११.३० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर हे प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभार डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून स्वीकारणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी दिली.

या कार्यक्रमासाठी कोणीही विद्यापीठ कार्यालयामध्ये येण्याचे टाळावे. स्थानिक जिल्हा प्रशासनाने लागू केलेल्या नियमांचे पालन करावे, असे आवाहनही कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

# डॉ. देवानंद शिंदे यांना उद्या निरोप

## जाहीर कार्यक्रम नाही; वेबसाईटवरून होणार कार्यपूर्ती संवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोविड - १९ साथीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या निरोप समारंभ बुधवार दि. १७ होणार आहे; मात्र यावेळी कोणताही जाहीर समारंभ करण्यात येणार नाही. तथापि, बुधवारी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या वेबसाईटवर कुलगुरू डॉ. शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कार्यपूर्ती संवादाचे थेट प्रक्षेपण करण्यात येईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

दरम्यान, बुधवारी सकाळी



११.३० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर हे प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार मावळते कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याकडून स्वीकारतील, अशी माहिती ही कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी दिली आहे. कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर जाहीर निरोप समारंभ करण्याचे टाळून ऑनलाईन स्वरूपात हा औपचारिक संवाद आयोजित करण्याचे ठरवले आहे.

कुलगुरु देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठात 'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' स्मरणिकेचे प्रकाशन

# पत्रकारिता विभागाने बदलांना सामोरे जाणारे अभ्यासक्रम घ्यावेत

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** सध्या विविध क्षेत्रातील भोवताल, वर्तमान बदलत आहे. कोरोनामुळे अधिकच आव्हाने निर्माण झाली असून अनेक बदल होत आहेत. पत्रकारितेचे क्षेत्रही त्यामुळे बदलत आहे. या नव्या बदलांना सामोरे जाणारे अभ्यासक्रम आणि विषय घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाने पुढे वाटचाल करावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मंगळवारी येथे केले.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी 'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' या स्मरणिकेचे प्रकाशन 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून व्ही. टी. पाटील, निशा पवार, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठात 'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' या सुवर्ण महोत्सवी स्मरणिकेचे प्रकाशन 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कुलगुरु कक्षात हा कार्यक्रम झाला. कोरोनामुळे शिक्षण क्षेत्रातील संदर्भ वेगाने बदलत आहेत. पत्रकारिता विभागाने तेथील शिक्षणात या बदलांचा समावेश करावा. या स्मरणिकेच्या माध्यमातून मांडलेली विभागाच्या वाटचालीची विद्यापीठाच्या इतिहासात नोंद होईल.

## अवकाश केंद्राला 'आर. व्ही. भोसले' यांचे नाव

ज्येष्ठ अवकाश संशोधक डॉ. आर. व्ही. भोसले यांनी शिवाजी विद्यापीठात मोठे योगदान दिले. त्यांच्या स्मृती जपणारे काम विद्यापीठाकडून व्हावे, असे संपादक वसंत भोसले यांनी सुचविले. त्यावर विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राला डॉ. भोसले यांचे नाव देणे ही त्यांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे. त्या दृष्टीने विद्यापीठाने कार्यवाही करावी, असे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.

त्यामुळे या स्मरणिकेला महत्त्व असल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील जनतेचे आणि विद्यापीठाचे एक वेगळे नाते आहे. शिवाजी विद्यापीठ हे कोल्हापूरच्या अस्मितेचे केंद्र असून तेथील पत्रकारिता विभागाची सुवर्णमहोत्सवी वाटचाल चांगली झाली आहे. वर्तमानाच्या दस्तऐवजीकरणाबरोबरच ऐतिहासिक नोंदी घेणेदेखील महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने पत्रकारिता विभागाची ही स्मरणिका फार महत्त्वाची असून तिचे संपादन, प्रकाशन करताना खूप आनंद होत आहे.

संवादाची साधने, तंत्रज्ञान बदलत आहेत. माध्यम कोणतेही असले, तरी आशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे तो दर्जेदार असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मांडणी करण्याबाबतचे अद्ययावत शिक्षण हे पत्रकारिता विभागातून देण्यात यावे, असे 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांनी सांगितले.

या कार्यक्रमास वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, सुधाकर बर्गे, आदी उपस्थित होते. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविकात ही ४०० पानी स्मरणिका तयार करण्याचा उद्देश, त्यात विभागाच्या मांडलेल्या वाटचालीचा आढावा घेतला. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

**इच्छुकांचे लॉबिंग : शिवाजी विद्यापीठाच्या मावळत्या कुलगुरूंनी घेतला निरोप**

# कुलगुरुपदाच्या निवडीतही राजकीय त्रांगडे

विश्वास पाटील ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी इच्छुकांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. या पदासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत २ जुलैपर्यंत आहे. राज्यात तीन पक्षांचे सरकार, केंद्रात भाजप आणि राज्य शासन व राज्यपाल यांच्यात मतभेद असे त्रांगडे झाल्यामुळे नेमके कुणाकुणाकडे लॉबिंग करायचे याचीच मोठी अडचण झाली आहे. मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची मुदत आज, बुधवारी संपत असून, त्यांनी मंगळवारी विद्यापीठाचा निरोप घेतला.

हे पद अकॅडेमिक असले तरी त्यांची नियुक्ती ही राजकीयच असते. त्यामुळे नुसती शैक्षणिक व व्यवस्थापकीय पात्रता असून चालत

## चर्चेतील नांवे व संधी

आतापर्यंतच्या निवडीमध्ये विद्यापीठ परिसरातील जी नावे या पदासाठी चर्चेत होती, ती फक्त वृत्तपत्रांतील बातम्यांपुरतीच चर्चेत राहिली आणि नियुक्ती मात्र दुसऱ्याचीच झाल्याचा अनुभव आहे.

## अशी असेल अर्ज प्रक्रिया

ऑनलाईन प्रक्रियेद्वारे २ जुलैपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यानंतर अर्जाची छाननी करून पात्र उमेदवारांची यादी तयार केली जाईल. तिघा तज्ज्ञांची कुलगुरू शोध समिती त्यातील मुलाखतीसाठी पाच व्यक्तींची नावे राज्यपालांकडे पाठवतील. राजभवनामध्ये राज्यपाल मुलाखती घेतील व त्यांतूनच एका व्यक्तीची निवड होईल. ही निवड पाच वर्षांसाठी असेल. या पाचमध्ये येणे हीच खरी कसोटी आहे.

नाही. त्याशिवाय राजकीय पाठबळही तितकेच महत्त्वाचे असते. कोल्हापूरचा सामाजिक चेहरा पाहता, या विद्यापीठाच्या कुलगुरूंची निवड होत असताना 'बहुजन समाजातील व्यक्तीस प्राधान्य' असाही विचार अनेकदा झाला आहे. या निवडीवेळी राज्यात जरी भाजपचे सरकार नसले तरी भाजप व राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या मताला फार महत्त्व आहे. अर्ज भरण्याची प्रक्रिया केंद्रीय मानव संसाधन मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या मंत्रालयातील अतिरिक्त संचालक यांच्याकडे आहे. त्यामुळे



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांशी बांधील असणाऱ्या व्यक्तींकडूनही या पदासाठी मोर्चेबांधणी केली जाऊ शकते. गेल्यावेळेच्या निवडीत बहुजन समाजातील चेहरा, परंतु संघाच्या विचारांशी धागा असलेली व्यक्ती हे निकष महत्त्वाचे ठरले आहेत. ज्या विचारांचे सरकार राज्यात असते, त्या विचारांचा प्रभाव या निवडीत पडतो.

यापूर्वी 'पुलोद'च्या काळात समाजवादी विचारांचे प्राचार्य भा. शं. भणगे यांना, नंतर शिवसेना-भाजपचे सरकार असताना (१९९५) ला द. ना. धनागरे यांना ही संधी मिळाली. काँग्रेसचे सरकार असताना राज्यपालही त्याच विचाराचे असल्यामुळे बहुजन समाजातील व्यक्तींना संधी मिळाल्याचे दिसते. आतापर्यंत विद्यापीठाचे १२ कुलगुरू झाले आहेत.

आता शिवसेनेचा मुख्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्रीही त्याच पक्षाचाच, राज्यपाल भाजपच्या जवळचे आणि सत्तेचा रिमोट दोन्ही काँग्रेसकडे व त्यातही ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडे असे चित्र आहे. या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात सहकार क्षेत्रावर जसे राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे, तसे शैक्षणिक संस्थांवर काँग्रेसचे वर्चस्व आहे. त्यामुळे काँग्रेसच्या म्हणण्यालाही महत्त्व आहे. यामुळे इच्छुकांची मात्र तारांबळ उडाली आहे. नक्की भेटायचे कुणाकुणाला, असाही प्रश्न त्यांच्यासमोर आहे. शरद पवार आणि राज्यपाल यांच्यातील संबंध ताणले असल्याने त्याचेही पडसाद या निवडीत उमटू शकतात.



...काम करीत होते. २) दुचाकी ...



...असणाऱ्या ... अनेक ...

## गांधीनगर मुख्य रस्त्यावर पाणी

गांधीनगर : गांधीनगरच्या मुख्य रस्त्यावरील गटारी तुंबल्याने पावसाचे पाणी थेट रस्त्यावर आले. [illegible]



कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : सर्वांच्या सहकार्याने पाच वर्षांचा प्रवास चिरस्मरणीय; कारकिर्द पूर्तीनिमित्त 'लोकमत'शी साधला संवाद

# शिवाजी विद्यापीठाला दिली 'ग्लोबल' ओळख



### पाच वर्षांतील ठळक

[illegible]

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, संशोधनातून उद्योगनिर्मिती, नावीन्यपूर्ण आणि अभिनव संशोधन, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि भविष्यवेधी अभ्यासक्रम या पंचसूत्रीचा आधार घेऊन शिवाजी विद्यापीठाची परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न केला. ग्लोबल ओळख आणि विद्यापीठाचा ब्रँड विकसित केला. त्यासाठी विद्यापीठाच्या विविध घटकांच्या कार्यातून मला सदोदित प्रेरणा मिळत राहिली, त्याबद्दल त्या सर्वांप्रती ऋण व्यक्त करतो, असे कुलगुरू देवानंद शिंदे यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या रासायनिक तंत्रज्ञान (केमिकल टेक्नॉलॉजी) विभागाचे प्रा. डॉ. शिंदे यांची शिवाजी विद्यापीठाच्या बाराव्या कुलगुरूपदी नियुक्ती झाली. त्यांचा पाच वर्षांचा कार्यकाल आज, बुधवारी पूर्ण होत आहे. त्यानिमित्त त्यांनी 'लोकमत'शी संवाद साधला.

मी औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून येथे आलो, तेव्हा येथे माझे कोणीच नव्हते आणि आज मात्र शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील तीनही जिल्ह्यात माझे ऋणानुबंध निर्माण झाले आहेत. शिवाजी विद्यापीठाने स्थापनेपासूनच आपल्या सामाजिक बांधीलकीची जाणीव सदोदित बाळगलेली आहे. दक्षिण महाराष्ट्राच्या उच्च शैक्षणिक उत्थानासाठी या विद्यापीठाने गेल्या ५० वर्षांत अतिशय मोलाचे योगदान दिले आहे. विद्यापीठाच्या प्रत्येक कुलगुरूंनी या विद्यापीठाचे पाऊल पुढेच टाकले जाईल, याची दक्षता घेऊन धोरणे आखली आणि त्यांच्या परिश्रमाचे, दूरदृष्टीचे फलित म्हणूनच आज शिवाजी विद्यापीठाचा लौकिक केवळ राष्ट्रीय नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पसरला आहे. त्या समस्त परंपरेला पुढे घेऊन जाण्याचे सद्भाग्य लाभले आणि माझ्या परीने ही जबाबदारी यशस्वीरीत्या पेलण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये भारतातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठाची क्रमवारी ५६-६० अशी तर, ब्रिक्स देशांतील शैक्षणिक संस्थांमध्ये ही क्रमवारी २५१-२६० अशी मिळाली. 'ग्यान' योजनेअंतर्गत परदेशी प्राध्यापकांची विद्यापीठात व्याख्याने घेतली. सध्या विद्यापीठात अमेरिकेतील दोन प्राध्यापक कार्यरत आहेत. ५० परदेशी विद्यार्थी विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. जर्मनी, दक्षिण कोरिया, तैवान, आदी देशांतील विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांसमवेत सामंजस्य करार केले आहेत. त्यातून विद्यापीठाची ग्लोबल ओळख आणि ब्रँड विकसित झाला. या विद्यापीठाचा कुलगुरू आणि देशील प्रशासनाबाबत असलेल्या विश्वासार्हतेमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी लाभली, याचे सारे श्रेय शिवाजी विद्यापीठ परिवाराला आहे. विद्यापीठातील विविध घटकांच्या साथीने हा पाच वर्षांचा प्रवास आनंददायी आणि चिरस्मरणीय झाला. या प्रवासाने मला अनुभवसमृद्ध केले असल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.



### कोल्हापूरने जीवनाकडे पाहण्याचा संस्कार दिला

करवीर नगरीने शाहू छत्रपती यांच्यापासून ते डॉ. डी. वाय. पाटील यांच्यापर्यंत आणि समाजातील प्रत्येक घटकाने जे प्रचंड प्रेम दिले, त्यातून उतराई होणं मला या जन्मात तरी शक्य होणार नाही. मी पाच वर्षांपूर्वीपर्यंत जगत होतोच, जिवंत होतोच. पण या कोल्हापूर नगरीने आणि कोल्हापूरकरांनी मला जगायचं कसं, ते शिकवलं. कोल्हापूरने जीवनाकडे पाहण्याचा संस्कार दिला असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले. गेल्या पाच वर्षांत काम करताना अनेकदा लग्नावरून जावे लागले. त्यापैकी एक वेळ, घरी आल्यावरदेखील मी आणि माझ्या कुटुंबीयांनी कार्यालयाशी संबंधित बाबींवर चर्चा करणे टाळले. ही पॉलिसी खूपच उपयुक्त ठरली. मी दैनंदिन कामात व्यस्त असतानाही अशा वेळी माझ्या कुटुंबाने समंजसपणाने साथ दिल्याचे त्यांनी सांगितले.

### पुरस्कारांची सुरुवात, पुस्तकांचे प्रकाशन

- छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय पुरस्कार, प्राचार्य डॉ. आर. के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्काराची सुरुवात.
- मेजर डी. सी. ग्रॅहम लिखित 'प्रिन्सिपॉलिटी ऑफ कोल्हापूर (१८५४)' या ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या सांख्यिकीय अहवालाचे पुनर्प्रकाशन.
- राजर्षी शाहू महाराज यांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा, डॉ. बाळकृष्ण लिखित 'शिवाजी - द ग्रेट' हा चौखंडीय महाग्रंथ.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांची पत्रकारिता, पद्मश्री (कै.) डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला संग्रह (सन १९८८-२०१९) यांचे प्रकाशन.
- शिवाजी विद्यापीठ इतिहास लेखनाची सुरुवात.



### आईचा सन्मान

[illegible]

### संशोधनाला चालना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रिसर्च सेन्सिटायझेशन स्कीम, विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी रिसर्च इनिशिएशन स्कीम, रिसर्च स्ट्रेंग्दनिंग स्कीम, रिसर्च प्रमोशन स्कीम, अॅप्रिसिएशन स्कीम, शिक्षक, बेस्ट रिसर्चर पुरस्कार, बेस्ट परफॉर्मिंग डिपार्टमेंट स्कीम, संशोधक विद्यार्थ्यांसाठी वित्तसाहाय्य योजना, आयपीआर व पेटंट फाइलिंगसाठी साहाय्यता, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रांतील उत्तम संशोधन निबंधांच्या परकीय भाषांमध्ये अनुवादासाठी अनुदान योजना, डॉक्टरल व पोस्ट-डॉक्टरल कार्यक्रमांसाठी वित्तसाहाय्य योजना या संशोधनाला प्रोत्साहनासाठी सुरू केल्या.

### ही कामे अपूर्ण राहिली...

विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज म्युझिअम आणि कन्व्हेन्शिअल सेंटर उभे करण्याचे ध्येय होते. त्यासह ग्रामीण भागातील मुलींसाठी सुरू केलेल्या बस पास योजनेची व्याप्ती वाढविण्याचे नियोजन होते. मात्र, ही कामे माझ्या कारकिर्दीत पूर्ण करता आली नसल्याची खंत डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली.

### ऑनलाईन पाऊल

विद्यापीठात डॉ. शिंदे यांच्या कारकिर्दीमध्ये माहिती-संवाद तंत्रज्ञानाधारित विविध उपक्रम सुरू झाले. त्यात शिव-सभा, शिव-प्रकाशन, शिव-दीक्षान्त, शिव-सारथी अॅप, शिव-कर्मचारी सेवा पोर्टल, वेब रेडिओ शिव-वाणी, फायनान्स अँड अकाउंट सिस्टीम सॉफ्टवेअर आदींचा समावेश आहे.

### कौशल्य विकास

स्किल ऑन द स्पॉट, स्किल ऑन व्हील, कौशल्य व रोजगार मेळावे, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व तृतीयपंथीयांसाठी विशेष कौशल्य विकास कार्यशाळा, मेळावे घेतले. आजपर्यंत दोन लाखांहून अधिक जणांना विविध कौशल्ये प्रदान केली. विद्यापीठ परिक्षेत्रासह पुणे येथे एकूण ४८ कौशल्य व रोजगार मेळावे घेतले. त्यातून सुमारे ७० टक्के विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

### आपत्ती व्यवस्थापन

महापूरकाळात कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांसाठी विद्यापीठाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यरत केली. १५ दिवसांहून अधिक काळ जलशुद्धीकरण केंद्रातून कोल्हापूर महापालिकेच्या माध्यमातून शहर व परिसराला पाणीपुरवठा केला. कॅम्पसवरील सुमारे ४० टन गवत जनावरांसाठी उपलब्ध करून दिल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

### पुरस्कारासह अन्य क्षेत्रांतील योगदान

- 'रोटरी इंटरनॅशनल'ने २००८ मध्ये डॉ. शिंदे यांना 'गुरुगौरव' पुरस्काराने सन्मानित केले.
- 'वारफेरिन' या हृदयरोगावरील औषधाच्या शोधासाठी त्यांना पहिले पेटंट मिळाले.
- वॉकहार्ट फाउंडेशनकडून 'एज्युकेशन पॉप्युलर अवॉर्ड २०१६' प्रदान. मराठवाडा समन्वय समितीने सप्टेंबर २०१७ मध्ये त्यांना 'मराठवाडा भूषण' पुरस्काराने सन्मानित केले.
- 'नमस्ते इंडिया' या प्रकल्पांतर्गत ऑक्सफर्ड विद्यापीठाने कुलगुरू डॉ. शिंदे यांचे वैद्यकीय रसायनशास्त्रातील भरीव संशोधनकार्य लक्षात घेऊन त्यांना 'व्हिजिटिंग स्कॉलर' म्हणून आमंत्रित केले.
- 'एन.सी.सी.'च्या केंद्रीय मुख्यालयाने त्यांना एप्रिल २०१८ मध्ये 'कर्नल कमांडंट' या 'मानद कर्नल'पदाचा बहुमान प्रदान केला.
- लातूरच्या स्वातंत्र्यसैनिक नारायणराव भगवंतराव कुलकर्णी-गौरकर यांच्या स्मरणार्थ 'नातवणी पुरस्कार - २०१८' प्रदान.

---

बहुभाषामी प्रशासक असणाऱ्या कुलगुरू डॉ. शिंदे यांनी अनेक गुणवत्तापूर्ण व नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. महाविद्यालयांना अनाहूतपणे भेटी देणारे माझ्या पाहण्यातील ते पहिलेच कुलगुरू होते. महाविद्यालयाचे प्राध्यापक, सेवक यांच्याशी ते सतत चर्चा करीत.

— डॉ. डी. आर. कणसे, प्राचार्य

कुलगुरूंची कारकीर्द चांगली गेली. अधिकारी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांना त्यांनी स्वायत्तपणे काम करू दिले. विविध अधिकार मंडळांचा त्यांनी आदर केला. या मंडळांना विश्वासात घेऊन त्यांनी काम केले.

— प्रा. भारती पाटील, अधिष्ठाता, मानव्यविद्या

कुलगुरूंनी सर्व घटकांना समावेशी ठेवण्याचा प्रयत्न केला. वैयक्तिक पातळीवर त्यांचा स्वभाव मनमिळाऊ आहे. विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप, प्राध्यापकांच्या नियुक्त्या, आदी प्रश्न प्रलंबित राहिले.

— गिरीश फोंडे, राष्ट्रीय समिती सदस्य, ऑल इंडिया यूथ फेडरेशन

कुलगुरूंची कारकिर्द यशस्वीपणे पार पडली. कॅम्पसवर शिक्षण घेणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांची वाढलेली संख्या, जागतिक पातळीवरील संस्थांशी केलेल्या 'एमओयू'द्वारे त्यांनी विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय ओळख निर्माण करून दिली. सामाजिक उपक्रमांत त्यांनी योगदान दिले.

— संजय जाधव, सदस्य, व्यवस्थापन परिषद

कुलगुरूंनी विद्यापीठाच्या उपलब्ध साधने, क्षमतांचा परिपूर्ण वापर करून कार्य केले. 'सुटा'ने मांडलेल्या शिक्षकांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक प्रतिसाद देत त्यांनी काही बाबींची पूर्तता केली.

— प्रा. सुभाष जाधव, सहकार्यवाह, 'सुटा'

कुलगुरूंनी संघटनांसमवेत चांगला संपर्क ठेवला. सेवकांचे प्रश्न समजून ते सोडविण्यासाठी त्यांनी चांगली पद्धत अवलंबली. कोणतीही त्यांनी तटा निर्माण केला नाही. सेवकांच्या विविध मागण्यांची त्यांनी पूर्तता केली.

— बाबा सावंत, अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ सेवक संघ

शिक्षणाचे संशोधनातील योगदान वाढविण्यासाठी त्यांनी विविध योजना सुरू केल्या. मुंबई, पुणे, औरंगाबाद या विद्यापीठांच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त पदभार सांभाळून त्यांनी शिवाजी विद्यापीठास लौकिक प्राप्त करून दिला.

— डॉ. जगन कराडे, समाजशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

शैक्षणिक, संशोधनासह डॉ. शिंदे यांनी प्रशासक म्हणून काम केले. अनुकंपासह विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न त्यांनी मार्गी लावले. अतिक्रमणाचे येऊन त्यांनी टाकलेली काही पावले चुकली. मात्र, त्याचे प्रमाण कमी आहे.

— वसंतराव मगदूम, संस्थापक-अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ

# कुलगुरु शिंदे यांना आज निरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या निरोपाचा आज, बुधवारी जाहीर समारंभ होणार नाही. मात्र, सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या वेबसाईटवर कुलगुरू डॉ. शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कार्यपूर्ती संवादाचे थेट प्रक्षेपण करण्यात येईल.

सकाळी ११.३० वा. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर हे प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मंगळवारी दिली. ऑनलाईन स्वरूपात हा औपचारिक संवाद आयोजित करण्याचे विद्यापीठ प्रशासनाने ठरविले आहे. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरून या संवादाचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. ऑनलाईन स्वरूपातच सर्व संबंधित घटकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे. या कार्यक्रमासाठी कोणीही विद्यापीठमध्ये येणे टाळावे. स्थानिक जिल्हा प्रशासनाने लागू केलेल्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन डॉ. नांदवडेकर यांनी केले आहे.

## कुलगुरुंनी घेतले अंबाबाईचे दर्शन

करवीरनिवासिनी अंबाबाईसह शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांचे दर्शन घेऊन कुलगुरु डॉ. शिंदे यांनी मंगळवारी शिवाजी विद्यापीठातील कारकिर्दीच्या अंतिम दिवसाच्या पूर्वसंध्येला करवीरनगरीचा भावनिक निरोप घेतला. त्यांनी अंबाबाईचे मुखदर्शन घेतले. त्यानंतर छत्रपती शिवाजी चौकातील शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास, बिंदू चौकामध्ये महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांसह शहीद स्मृतिस्तंभास अभिवादन केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यासह डॉ. बापूजी साळुंखे आणि लोकनेते बाळासाहेब देसाई आणि करवीर संस्थापक छत्रपती ताराराणी यांच्या पुतळ्याचेही दर्शन घेऊन डॉ. शिंदे यांनी अभिवादन केले.

श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर